# बृहन्मुंबई महानगरपालिका



**महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर**

यांना ६४ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे भावपूर्ण अभिवादन !

वर्ष-२०२०

**'कोविड-१९' चा प्रादुर्भाव लक्षात घेता यावर्षी चैत्यभूमी व लगतच्या परिसरात महानगरपालिकेतर्फे पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा अंशतः कमी करतानाच काही विशेष सेवा यावर्षी देण्यात येत आहेत. त्याबाबतचा संक्षिप्त तपशील पुढीलप्रमाणे आहे :**

- **चैत्यभूमी येथून ऑनलाईन प्रक्षेपण पुढील लिंकवर उपलब्ध : १. https://bit.ly/abhivadan2020yt २. https://bit.ly/abhivadan2020fb ३. https://bit.ly/abhivadan2020tt**
- **ऑनलाईन थेट प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी राहूनच करता येणार अभिवादन**
- **चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना.**
- **चैत्यभूमी स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी.**
- **येणाऱ्या अनुयायांसाठी आवश्यकतेनुसार 'कोविड-१९' ची चाचणी व इतर आरोग्य सोयी - सुविधा.**

## गेल्यावर्षी चैत्यभूमी / छत्रपती शिवाजी महाराज मैदान परिसरात देण्यात आलेल्या नागरी सेवा-सुविधा

१) शामियाना व व्ही.आय.पी. कक्षासह नियंत्रण कक्षाची व्यवस्था.
२) नियंत्रण कक्षाशेजारी, तोरणागेट प्रवेशद्वाराजवळ व सूर्यवंशी सभागृह मार्ग अशा ३ ठिकाणी रुग्णवाहिकेसहित आरोग्यसेवा.
३) १ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा.
४) मैदान व परिसरात १८ फिरती शौचालये (१८० शौचकुपे).
५) रांगेत असणाऱ्या अनुयायांसाठी ०४ फिरती शौचालये (४० शौचकुपे).
६) पिण्याच्या पाण्याच्या ३८० नळांची व्यवस्था.
७) रांगेत व परिसरात असणाऱ्या अनुयायांसाठी पिण्याच्या पाण्याचे १६ टँकर्स.
८) कर्मचारी व वाहतूक व्यवस्थेमार्फत संपूर्ण परिसरात स्वच्छता.
९) संपूर्ण परिसरात विद्युत व्यवस्था.
१०) अग्निशमन दलामार्फत आवश्यक ती सेवा.
११) अग्निशमन दलामार्फत चैत्यभूमीलगतच्या चौपाटीवर सुरक्षा रक्षकासहीत बोटीची व्यवस्था.
१२) चैत्यभूमीतील आदरांजलीचे मोठ्या पडद्यांवर थेट प्रक्षेपण.
१३) छत्रपती शिवाजी महाराज मैदानात ४६९ स्टॉल्सची रचना.
१४) स्काऊट गाईड हॉल येथे भिक्कू निवासाची व्यवस्था.
१५) मैदानात धुळीचा त्रास रोखण्याकरिता पायवाटांवर आच्छादनाची व्यवस्था.
१६) मैदान व चैत्यभूमी येथे अनुयायांना मार्गदर्शनाकरिता १०० फूट उंचीवर स्थळ निदर्शक फुग्याची व्यवस्था.
१७) भ्रमणध्वनी चार्जिंगकरिता मैदानात ३०० पॉइंटची व्यवस्था.
१८) मैदानात फायबरच्या २०० तात्पुरत्या स्नानगृहाची व फायबरच्या तात्पुरत्या ६० शौचालयांची व्यवस्था.
१९) इंदू मिलच्या मागे फायबरची प्रत्येकी ६० शौचालये व ६० स्नानगृहे
२०) रांगेतील अनुयायांसाठी तात्पुरते छत व बसण्यासाठी १५० बाकड्यांची व्यवस्था.
२१) महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर माहिती पुस्तिकेचे मोफत वितरण.

## गेल्यावर्षी महानगरपालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी देण्यात आलेल्या सेवा-सुविधा

२२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा, दादर (पूर्व) येथे १५०० चौ. मी. क्षेत्रफळात तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था, तसेच या ठिकाणी फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.
२३) जी/उत्तर, दादर (पश्चिम) रेल्वे स्थानकाजवळ आणि एफ/उत्तर, दादर (पूर्व) स्वामिनारायण मंदिराजवळ नियंत्रण कक्ष /माहिती कक्ष, फिरती शौचालये, स्नानगृहे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आणि वैद्यकीय कक्ष.
२४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे निवासस्थान असणाऱ्या राजगृह येथे नियंत्रण कक्ष आणि वैद्यकीय कक्ष.
२५) महापालिकेच्या एल विभाग - लोकमान्य टिळक टर्मिनस (कुर्ला टर्मिनस) परिसरात नियंत्रण कक्ष, आरोग्य सेवा कक्ष आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था.

**सेवा-सुविधांबाबत संपर्क :**

| **किरण दिघावकर** | **विजय बालमवार** | **संजीव जयस्वाल** |
|---|---|---|
| सहाय्यक आयुक्त (जी/उत्तर) | उप आयुक्त (परिमंडळ-२) | अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (शहर) |
| दूरध्वनी : २४३९ ७८०० | दूरध्वनी : २४१५ ०४०० | दूरध्वनी : २२६२ ०४३३ |



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

### जागृतीचे प्रणेते



# महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांना विनम्र आवाहन

महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे दिनांक ६ डिसेंबर १९५६ रोजी दिल्लीत महापरिनिर्वाण झाल्यानंतर मुंबईतील दादर चौपाटी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी लाखोंच्या संख्येने लोक उपस्थित होते.

तद्नंतर प्रत्येक वर्षी ६ डिसेंबर रोजी लाखोंच्या संख्येने भारताच्या कानाकोपऱ्यातून आलेले अनुयायी चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर नतमस्तक होतात आणि अभिवादन करतात.

या प्रचंड जनसमुदायासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे दरवर्षी विविध नागरी सेवा- सुविधा पुरविण्यात येतात. या सेवा-सुविधा प्रामुख्याने चैत्यभूमी परिसर व छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे उपलब्ध करुन देण्यात येतात. या सेवा-सुविधांमध्ये तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची सोय, शौचालये, स्नानगृहे, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, सुरक्षिततेसाठी धातू शोधक, क्लोज सर्किट टिव्ही, चैत्यभूमीजवळील समुद्रात जीवरक्षक बोटी आणि अग्निशमन व नियंत्रण कक्ष सेवा इत्यादींचा समावेश आहे.

यंदा 'कोविड-१९' अर्थात कोरोना विषाणू प्रादुर्भावाची स्थिती लक्षात घेता चैत्यभूमी व लगतच्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे महापरिनिर्वाण दिनी पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा काही अंशी कमी करतानाच इतर काही विशेष सेवा यंदा पुरविण्यात येत आहेत. यात मुख्यत्वे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक असलेल्या चैत्यभूमी येथून ऑनलाईन पद्धतीने थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या थेट ऑनलाईन प्रक्षेपणामुळे अनुयायांना आपापल्या घरी, स्थानिक परिसरात राहूनच अभिवादन करता येणार आहे. प्रत्यक्ष चैत्यभूमी स्मारक येथे शासकीय मानवंदना दिली जाणार असून स्मारकावर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. 'कोविड-१९' संदर्भातील मार्गदर्शक सूचना पाळून सर्व उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे.

| | | |
|---|---|---|
| **इ. सिं. चहल** | **ॲड. सुहास वाडकर** | **किशोरी किशोर पेडणेकर** |
| मा. महानगरपालिका आयुक्त | मा. उप महापौर, मुंबई | मा. महापौर, मुंबई |

# दुर्दम्य आशावादाचे प्रतीक : डॉ. बाबासाहेब आंबेडकर

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन हा त्यांच्या विचार, कार्य आणि एकंदर जीवनाला स्मरण करुन अभिवादन करण्याचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य इतके वैविध्यपूर्ण आणि अफाट आहे की, त्यांच्या कार्याला कोणत्याही एका परिमाणात मोजणे निव्वळ अशक्य आहे. अस्पृश्यांचे उद्धारकर्ते म्हणून त्यांचे जीवन जितके वंदनीय आहे; तितकेच आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, विधि, साहित्य अशा निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये त्यांनी दिलेले योगदान देखील वंदनीय आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील व्यक्ती म्हणून आणि एक सर्वसामान्य नागरिक म्हणून देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल व्यक्तिशः मला प्रचंड आदर वाटतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर राष्ट्र उन्नती, समाज उन्नती यांचा प्रामुख्याने विचार करताना जवळपास सर्वच घटकांचा बारकाईने विचार केला. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर कोणत्या ना कोणत्या स्वरूपात संघर्ष करत वाटचाल करताना ते आपल्या ध्येयापासून तसूभरही ढळले नाहीत. मुंबईमध्ये ४ ऑक्टोबर १९४७ रोजी केलेल्या भाषणात ते म्हणाले होते की, 'आपले आचरण शुद्ध ठेवून, आपल्या इच्छित ध्येयासाठी जागरूक राहिले पाहिजे. आजच्या परिस्थितीत आपले मनोरथ जरी साध्य झाले नाही तरी ते साध्य करूच करू, अशा निश्चयाने वागले पाहिजे.' याच अढळ भावनेने आपल्या ध्येयासाठी ते शेवटपर्यंत झटत राहिले आणि यामुळेच आजही अवघे विश्व त्यांचे स्मरण करते.

भारताची उभारणी स्वातंत्र्यासोबतच समता, बंधुता आणि न्याय या मूल्यांना जपणारी झाली पाहिजे, याबद्दल ते आग्रही होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये लोकशाहीचा स्वीकार करत असताना, हे तीनही मूल्य मूलभूत स्वरूपात रुजावेत, म्हणून त्यांनी राज्यघटनेच्या माध्यमातून दिलेले योगदान थक्क करून सोडणारे आहे.

समाजातील दोषांचे निर्मूलन करणे, हाच कायदा करण्याचा हेतू असतो, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानत. पुणे जिल्हा कायदे वाचनालयातर्फे दिनांक २२ डिसेंबर १९५२ रोजी आयोजित कार्यक्रमात स्वतंत्र भारतातील लोकशाही कशी यशस्वी होईल, याविषयी विचार मांडले होते. त्यावेळी ते म्हणाले होते , "मी स्वतः लोकशाहीची एका वेगळ्या मार्गाने व्याख्या करतो आणि मला असे वाटते की, ती पुष्कळशी सत्य आहे. रक्तपाताशिवाय लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणाऱ्या शासन व्यवस्थेच्या प्रकारास आणि पद्धतीस लोकशाही म्हणतात. लोकशाही, जर ती चालविणाऱ्या लोकांना, लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात मूलभूत बदल घडवून आणण्यासाठी साहाय्यभूत होत असेल आणि लोक हा बदल रक्तपाताचा आश्रय न घेता स्वीकारण्यास तयार असतील तर त्या ठिकाणी लोकशाही आहे असे मी मानतो. लोकशाहीची ही खरी कसोटी आहे. कदाचित ही कठोर कसोटी असेल, परंतु ज्यावेळी तुम्ही एखाद्या वस्तूच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करता त्यावेळेस तुम्ही ती कठोर कसोटी लावता. याचाच अर्थ लोकशाही ही लादलेली नव्हे तर स्वीकारलेली असावी, त्यात सर्वांसाठी सर्व काही असावे, असे त्यांचे म्हणणे होते. हे सहज सोपे वाटत असले तरी प्रत्यक्षात तितकेच कठीण होते.

याचे मुख्य कारण म्हणजे इतिहास, भूगोल, संस्कृती, समाजजीवन, आचारविचार, चालीरीती अशी कोणतीही बाब भारतात नाही की त्यात प्रचंड वैविध्यता नाही. असा हा देश वर्षानुवर्ष गुलामगिरीत पिचला असताना, तो स्वतंत्र झाल्यानंतर त्यास एकसंध राहून वाटचाल करता यावी आणि त्याचवेळी त्याचे वैविध्यपूर्ण वैशिष्ट्य देखील टिकावे यासाठी राज्यघटना तयार करून देण्याचे सर्वात अवघड कार्य या महामानवाने केले, त्यास तोड नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि कर्तृत्व किती दूरदृष्टीचे होते, याचे प्रत्यंतर आजही वारंवार येते. कारण त्यांनी तयार केलेल्या भारतीय राज्यघटनेच्या आधारे स्वतंत्र भारताची वाटचाल सुरु झाली आणि आजही त्याच मार्गाने आपण पुढे जातो आहोत.

प्रशासकीय सेवेमध्ये प्रत्यक्ष कार्य करत असताना वेगवेगळ्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब यांचे प्रशासनाबद्दलचे विचार, कार्य जाणून घेण्याची संधी मिळाली. त्यातील एक वाक्य माझ्या कायम स्मरणात आहे. पुण्यातील एका कार्यक्रमात ते असे म्हणाले होते की, ‘प्रशासकीय सेवा ही स्थायी असते. ती सर्व पक्षांची सारखीच सेवा करते,’ डॉ. आंबेडकर यांचे हे वाक्य प्रशासनाचे मूळ सूत्र आहे. शासनाने आखून दिलेल्या ध्येय धोरणांची अंमलबजावणी करताना प्रशासन हे जनतेची सेवा हे एकमेव उद्दिष्ट ठेवून कार्यरत असले पाहिजे, यासाठी संविधानामध्ये देखील तितक्याच भक्कम तरतुदी डॉ. आंबेडकर यांनी करून ठेवलेल्या आहेत. फक्त संविधान देऊन ते थांबले नाहीत. संविधान, कायदे यांच्या अंमलबजावणीबाबत देखील ते विचारशील व सजग होते.

आज मागे वळून पाहताना स्वातंत्र्यापर्यंतचा आणि त्याच्या आधीचा देखील कालावधी लक्षात घेतला तर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, जगातील इतर लोकशाही शासित देशांच्या तुलनेत भारताची प्रगती निश्चित वाखाणण्याजोगी आहे. देशातील आपली वैविध्यता जपून सामाजिक प्रगती साध्य होताना दिसते आहे आणि त्याचे श्रेय संविधानाला पर्यायाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना द्यावे लागेल.

मुंबईतील माझगांवमध्ये फेब्रुवारी १९३३ मध्ये एका जाहीर सभेत ते म्हणाले होते की, ‘या जगामध्ये स्वाभिमानाने जगायला शिका. या जगात आपण काही तरी करून दाखवायचेच, अशी महत्त्वाकांक्षा सदैव तुमच्याकडे असली पाहिजे. जे झगडतात तेच पुढे येतात.’ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपले संपूर्ण आयुष्य अशाच दुर्दम्य आशावादाच्या जोरावर व्यतीत केले. परमपूज्य बाबासाहेबांचे स्मरण करत असताना आपणही असाच आशावाद बाळगून राष्ट्र आणि समाज उन्नतीसाठी आपापल्या परीने शक्य ते केले पाहिजे, हीच परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

**इ. सिं. चहल**
**महानगरपालिका आयुक्त**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१८९१ : महू, मध्यप्रदेश येथे सैनिक छावणीत जन्म (१४ एप्रिल).
१९०७ : डॉ.आंबेडकरांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली.
१९०८ : रमाबाई वलंगकर यांच्यासोबत विवाह.
१९१० : इन्टरमीडिएट परीक्षा उत्तीर्ण.
१९१२ : बी. ए. परीक्षा उत्तीर्ण.
१९१३ : वडील सुभेदार रामजी यांचे निधन (२ फेब्रुवारी).
१९१३ : सयाजीराव गायकवाड यांनी विदेशात अध्ययनासाठी शिष्यवृत्ती बहाल केली (१ जून).
१९१३ : उच्च शिक्षणाकरीता न्यूयॉर्क (अमेरिका) येथे रवाना.
१९१५ : 'ॲन्शंट इंडियन कॉमर्स' या प्रबंधावर एम. ए. ची उपाधी बहाल.
१९१६ : 'नॅशनल डिविडंड ऑफ इंडिया : ए हिस्टॉरिकल अँड अनालिटिकल स्टडी' प्रबंध कोलंबिया विद्यापीठाद्वारे स्वीकृत.
१९१६ : पीएच. डी. पदवी बहाल.
१९१८ : सिडेनहॅम कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्रोफेसर म्हणून नियुक्ती (११ नोव्हेंबर).
१९२० : राजर्षी शाहू यांच्या साहाय्याने 'मूकनायक' पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित (३१ जाने.)
१९२० : माणगाव (कोल्हापूर) येथे बहिष्कृत परिषदेचे अध्यक्षपद (१ मार्च).
१९२० : अखिल भारतीय बहिष्कृत परिषद,नागपूर(१मे).
१९२२ : बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण.
१९२३ : डॉक्टर ऑफ सायन्सची पदवी बहाल.
१९२४ : 'बहिष्कृत हितकारिणी सभा' ची स्थापना, मुंबई (२० जुलै).
१९२६ : 'राजरत्न' या मुलाचे निधन (जुलै).
१९२७ : कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद, महाड (१९ मार्च).
१९२७ : 'बहिष्कृत भारत' पाक्षिकाचे प्रकाशन (३ एप्रिल).
१९२७ : मुंबई विधिमंडळात सदस्य म्हणून निवड.
१९२७ : 'समाज समता संघ' ची स्थापना (४ सप्टेंबर).
१९२७ : डॉ. आंबेडकरांचे ज्येष्ठ बंधू बाळाराम आंबेडकर यांचे निधन (१२ नोव्हेंबर).
१९२७ : अमरावती येथे अंबादेवी मंदिर सत्याग्रह (१३ नोव्हेंबर).
१९२७ : महाडचा सत्याग्रह आणि मनुस्मृती दहन (२५ डिसेंबर).
१९२८ : मुंबई येथे सरकारी विधी महाविद्यालयात प्राध्यापक (जून).
१९२८ : 'समता' पाक्षिकाचा आरंभ (२९ जून).
१९२८ : 'सायमन कमिशन' पुढे साक्ष (२३ ऑक्टोबर).
१९२९ : अस्पृश्यांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्याबाबत मुंबई विधिमंडळात भाषण.
१९३० : काळाराम मंदिर, नाशिक सत्याग्रह प्रारंभ (३ मार्च).
१९३० : लंडन येथे गोलमेज परिषदेसाठी मुंबईहून रवाना (२ ऑक्टोबर).
१९३० : गोलमेज परिषदेत अस्पृश्यांची बाजू ठामपणे मांडली (नोव्हेंबर).
१९३० : 'जनता' साप्ताहिकाचा आरंभ (२४ नोव्हेंबर).
१९३१ : मणीभवन, मुंबई येथे गांधीजींसोबत पहिली भेट (१४ ऑगस्ट).
१९३१ : अल्पसंख्याकांच्या प्रश्नाबाबत गांधीजींच्या धोरणाला गोलमेज परिषदेत विरोध (८ ऑक्टोबर).
१९३१ : गांधी-आंबेडकर-पंचम जॉर्ज यांची भेट (२६ नोव्हेंबर).
१९३२ : पुणे करारावर स्वाक्षरी (२४ सप्टेंबर).
१९३५ : पत्नी रमाबाई यांचे निधन (२७ मे).
१९३५ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्ती (२ जून).
१९३५ : येवला, 'हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही.' डॉ. आंबेडकरांची धर्मांतराची घोषणा (१३ ऑक्टोबर).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९३६ : 'जातीप्रथेचे उन्मूलन' भाषण प्रकाशित (मे).
१९३६ : 'मुक्ती कोन पथे' विख्यात भाषण, मुंबई (३१ मे).
१९३६ : स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना (१५ ऑगस्ट).
१९३७ : मुंबई असेंब्ली निवडणूक, डॉ.आंबेडकर विजयी (१७ फेब्रुवारी ).
१९३७ : कोकणातील 'खोती' नष्ट करण्याकरीता मुंबई विधिमंडळात बिल मांडले (१७ सप्टेंबर).
१९३८ : पंढरपूर, मातंग परिषदेतर्फे मानपत्र अर्पण (४ जानेवारी).
१९३८ : मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगार परिषद (१२-१३ फेब्रुवारी ).
१९३८ : मुंबई विधि महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावरुन राजीनामा (मे ).
१९३८ : औद्योगिक कलहाचे विधेयक मुंबई विधिमंडळात मांडले (सप्टेंबर ).
१९३८ : स्वतंत्र मजूर पक्षातर्फे सत्याग्रह (७ नोव्हेंबर).
१९३९ : महाड, शेतकरी परिषदेचे अध्यक्षपद - काँग्रेसच्या शेतकरी - विरोधी धोरणावर टीका (जानेवारी).
१९४० : सुभाषचंद्र बोस यांच्यासोबत भेट, मुंबई (२२ जून).
१९४० : 'थॉट्स ऑन पाकिस्तान' ग्रंथाचे प्रकाशन.
१९४२ : अखिल भारतीय शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना (एप्रिल).
१९४२ : भारतीय दलित वर्ग परिषद, नागपूर येथे हजर (१९ जुलै).
१९४२ : मजूर मंत्री म्हणून निवड.
१९४३ : पुणे येथे विख्यात भाषण; 'रानडे, गांधी आणि जिन्ना' (१९ जानेवारी).
१९४५ : 'काँग्रेस आणि गांधींनी अस्पृश्यांप्रति काय केले' ग्रंथ प्रकाशित (जून ).
१९४६ : मुंबई येथे सिद्धार्थ महाविद्यालयाची स्थापना (२० जून).
१९४६ : 'शूद्र पूर्वी कोण होते ?' हा ग्रंथ प्रकाशित.
१९४६ : भारताला कोणतीही शक्ती एकात्मक होण्यापासून परावृत्त करु शकत नाही. संविधान सभेत भाषण (१७ डिसेंबर ).
१९४७ : भारताचे पहिले कायदे मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश (ऑगस्ट ).
१९४७ : संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर निवड (२९ ऑगस्ट ).
१९४८ : डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत विवाह (१५ एप्रिल).
१९४८ : 'दि अनटचेबल्स' ग्रंथ प्रकाशित (ऑक्टोबर).
१९४८ : सरसंघचालक माधवराव गोळवलकर यांच्यासोबत भेट (सप्टेंबर).
१९४८ : घटनेचा मसुदा घटना समितीसमोर ठेवला (४ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीत देशभक्तीने ओथंबलेले समारोपीय भाषण (२५ नोव्हेंबर).
१९४९ : घटना समितीने घटना स्वीकार केली (२६ नोव्हेंबर).
१९५० : 'बुद्ध आणि त्यांच्या धम्माचे भवितव्य' लेख महाबोधी संस्थेच्या मासिकात प्रसिद्ध (मे).
१९५० : कोलंबोत विश्‍व बौद्ध परिषदेला उपस्थित (२५ मे).
१९५० : औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालय स्थापन (१९ जून ).
१९५१ : लोकप्रतिनिधीत्व विधेयक लोकसभेपुढे मांडले (मे ).
१९५१ : 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती' हा लेख महाबोधी मासिकामध्ये प्रकाशित (सप्टेंबर ).
१९५१ : हिंदू कोड बिल व मागासवर्गीयांच्या आरक्षणाबाबत मंत्रिपरिषदेचा राजीनामा (२७ सप्टेंबर).
१९५२ : प्रथम सार्वत्रिक निवडणुकीमध्ये पराभव (जानेवारी ).
१९५२ : राज्यसभेसाठी निवड (मार्च).
१९५२ : कोलंबिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी अर्पण (५ जून ).

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवनपट

१९५३ : हैद्राबाद, उस्मानिया विद्यापीठातर्फे 'डॉक्टर ऑफ लिटरेचर' पदवी अर्पण (१२ जानेवारी ).

१९५४ : 'महात्मा फुले' या चित्रपटाच्या मुहूर्त समारंभास उपस्थित (३० जानेवारी).

१९५४ : भंडारा पोटनिवडणुकीमध्ये पराभव (मे).

१९५४ : आकाशवाणीवर 'माझे वैयक्तिक तत्त्वज्ञान' भाषण (३ ऑक्टोबर).

१९५४ : माझे आयुष्य तीन गुरुंनी आणि तीन उपास्य दैवतांनी घडले (२८ ऑक्टोबर ).

१९५४ : रंगून, तिसऱ्या जागतिक बौद्ध परिषदेला उपस्थित (डिसेंबर).

१९५५ : भारतीय बौद्ध महासभा स्थापित (४ मे ).

१९५६ : मुंबई ही महाराष्ट्राची आहे, अशी ताकीद भारत सरकारला दिली (४ फेब्रुवारी).

१९५६ : 'ऑक्टोबर महिन्यात मी बौद्धधर्माची दीक्षा घेईन' अशी घोषणा नरेपार्क, मुंबई येथे केली (२४ मे).

१९५६ : नागपूर येथे पूज्य भंते महास्थवीर चंद्रमणी यांच्या हस्ते पत्नीसोबत धम्मदीक्षा घेतली व नंतर आपल्या ५ लाख अस्पृश्य बंधूंना बौद्ध धम्माची दीक्षा दिली (१४ ऑक्टोबर).

१९५६ : 'बौद्ध धम्म हा स्वीकारला' याविषयी सकाळी अभूतपूर्व भाषण व नागपूर म्युनिसिपालिटीतर्फे संध्याकाळी मानपत्र अर्पण (१५ ऑक्टोबर).

१९५६ : चंद्रपूर येथे २ लाख अस्पृश्य बंधूंना धम्मदीक्षा दिली (१६ ऑक्टोबर).

१९५६ : काठमांडू, नेपाळ येथे जागतिक बौद्ध परिषदेत 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' हे अभूतपूर्व भाषण दिले (२० नोव्हेंबर).

१९५६ : दिल्ली येथे त्यांच्या निवासस्थानी महापरिनिर्वाण (०६ डिसेंबर).

१९५६ : मुंबई येथे दादर चौपाटीच्या किनाऱ्यावर १० लाख लोकांच्या साक्षीने बौद्ध पद्धतीनुसार अंतिम संस्कार (७ डिसेंबर).



# बाबासाहेबांचे तीन गुरु



तथागत गौतम बुद्ध



संत कबीर



महात्मा जोतिबा फुले

''माझे आयुष्य तीन गुरू आणि तीन उपास्य दैवतांनी घडले आहे. माझे पहिले आणि श्रेष्ठ गुरु 'बुद्ध' होत. माझे दुसरे गुरु 'कबीर' आणि तिसरे गुरू म्हणजे 'जोतिबा फुले' होत... माझी तीन उपास्य दैवतेही आहेत. पहिले दैवत 'विद्या', दुसरे दैवत 'स्वाभिमान' आणि तिसरे दैवत म्हणजे 'शील' होय.'' (मुंबई, १९५४)

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर

# निखाऱ्यावर भाजलेली मुले

**- आचार्य प्र. के. अत्रे**

दहा वर्षापूर्वीची गोष्ट. आंबेडकरांच्या पंचावनाव्या वाढदिवशी नवयुगचा खास अंक काढावयाचा आम्ही ठरविले. म्हणून आम्ही त्यांच्याकडे संदेश मागावयास गेलो. बाबासाहेब हसून म्हणाले, 'महाराचा कसला वाढदिवस साजरा करता?' त्यांच्या या प्रश्नाला उत्तर देण्याचे आम्हाला काय तोंड होते ? आम्ही खाली मान घातली आणि गप्प बसलो. तेव्हा बाबा एकदम गंभीर झाले. आमची भावना त्यांना कळली. ते म्हणाले, "खरे सांगू ? व्यक्तिशः माझा वाढदिवस साजरा व्हावा, हे मला मुळीच आवडत नाही. या देशात अवतारी पुरुष आणि राजकीय पुरुष ह्या दोघांचेच जन्मदिवस पाळले जातात. फार दुःखाची गोष्ट आहे ही - मी लोकशाहीचा कट्टर पुरस्कर्ता आहे. मला विभूतीपूजा कशी आवडेल ? विभूतीपूजा हा लोकशाहीचा विपर्यास आहे. पुढारी लायक असेल तर त्याच्याबद्दल प्रेम बाळगा. आदर दाखवा. पण पुढाऱ्यांची देवाप्रमाणे पूजा कसली करता? त्यामुळे पुढाऱ्यांबरोबर भक्तांचाही अधःपात होतो."

बाबा बोलत होते आणि आम्ही कागदावर त्यांचे शब्द टिपून घेत होतो. 'हा झाला आमच्या स्पृश्यांना संदेश.' आम्ही म्हणालो, 'आता तुमच्या अस्पृश्यांना तुमचा संदेश द्या.' 'अस्पृश्यांना काय देऊ संदेश ?' डोळे अर्धवट मिटून बाबासाहेब स्वतःशीच पुटपुटले. इतक्यात त्यांना कसली तरी आठवण झाली. "ग्रीक पुराणातील एक गोष्टच मी तुम्हाला सांगतो. होमरने आपल्या महाकाव्यात सांगितली आहे ती. डिमेटर नावाची एक देवता मनुष्यरुप धारण करुन पृथ्वीतलावर आली. तिला एका राणीने आपले तान्हे मूल सांभाळावयाला आपल्या राजवाड्यात नोकरीस ठेवले. त्या लहान मुलाला देव बनवावे अशी त्या देवतेला इच्छा झाली. म्हणून ती रोज रात्री सारी मंडळी झोपली की सारी दारे बंद करी. मुलाला पाळण्यातून बाहेर काढी आणि त्याचे कपडे उतरुन ती त्याला जळत्या निखाऱ्यांवर ठेवी. हळूहळू निखाऱ्यांची धग सहन करण्याचे सामर्थ्य त्या मुलामध्ये उत्पन्न झाले. त्याचे बळ वाढू लागले. त्याच्यामध्ये अत्यंत तेजस्वी असा दैवी अंश विकसित होऊ लागला ; पण एका रात्री त्याची आई एकाएकी त्या खोलीत शिरली. तिच्या दृष्टीस तो सारा प्रकार पडताच ती भयंकर संतापली. तिने आपले मूल चटकन निखाऱ्यावरुन उचलून घेतले आणि त्या देवतेला हाकलून दिले. अर्थात राणीला तिचे मूल मिळाले ; पण त्याचा जो 'देव' होणार होता, त्या देवाला मात्र ती मुकली ! ही गोष्ट हाच अस्पृश्यांना माझा संदेश ! तो हा की, विस्तवातून गेल्यावाचून देवपण येत नाही."

अग्नि हा माणसाला शुद्ध करतो आणि त्याचे बळ वाढवितो. म्हणून दलित माणसाला हालअपेष्टा आणि त्यागाच्या आगीमधून जावयालाच पाहिजे. तरच त्याचा उद्धार होईल. बायबलात सांगितले आहे की, आयुष्याच्या शर्यतीत भाग घेण्याचे आमंत्रण सर्वांना येते. पण फक्त मोठी माणसे ती शर्यत जिंकू शकतात. ह्याचे कारण काय ? तर पुढच्या कल्याणासाठी आज मिळणाऱ्या गोष्टींचा त्याग करावयास लागणारे धैर्य दलितांच्या अंगी नसते ; म्हणून आयुष्याच्या शर्यतीत ते मागे राहतात.

मला ठाऊक आहे, आम्ही अस्पृश्यांनी आजपर्यंत हजारो वर्षे हाल सोसले आहे. छळ सोसला आहे. झगडा केला आहे. पण इतके असूनही मी पुन्हा हाच संदेश देतो की, 'झगडा, आणखी झगडा. त्याग करा, आणखी त्याग करा. त्यागाची आणि हालांची पर्वा न करता एकसारखा झगडा चालू ठेवाल, तरच तुम्हाला मुक्ती मिळेल.' प्रतिकार करण्याची अस्पृश्यांची सामुदायिक इच्छाशक्ती वाढली पाहिजे. आपले कार्य पवित्र आहे, यावर त्यांचा दृढविश्वास पाहिजे. आपल्यावर लादली गेलेली गुलामगिरी नष्ट करण्यासाठी त्यांनी आपले तन, मन, धन आणि तारुण्य कुर्बान केले पाहिजे. बऱ्याची, वाईटाची, सुखाची, दुःखाची, वादळाची, मानाची आणि अपमानाची पर्वा न करता अस्पृश्य एकसारखे झगडत राहतील तरच त्यांचा उद्धार होईल !'

लोहार ऐरणीवर जसे घाव घालतो तशा त्वेषाने आणि आवेशाने बाबासाहेबांच्या तोंडातून एकेक शब्द निघत होता. इतकी वर्षे झाली तरी त्यांचे ते दिव्य शब्द आमच्या कानात अजून घुमत आहेत. बाबासाहेबांचा हा संदेश त्यांच्या लक्षावधी अनुयायांनी अक्षरशः पाळलेला आहे. म्हणून आज त्यांच्यात एवढे ऐक्य, सामर्थ्य आणि कडवेपणा निर्माण झालेला आहे. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणजे बाजारबुणगे नव्हेत. ते एक लढाऊ सैन्य आहे. ते लढाऊ बळ आणि निर्धार बाबांनी त्यांच्यामध्ये कसा निर्माण केला ? तर डिमेटर देवीप्रमाणे त्यांनी ही आपली लाखो मुले रोजच्या रोज निखाऱ्यावर भाजून काढली. कढवली, परतली, उकळली. तेव्हा वाटेल त्या दुःखाला, संकटाला आणि आपत्तीला तोंड देण्याचे सामर्थ्य आज त्यांच्यामध्ये निर्माण झाले आहे. जगामध्ये आजपर्यंत रक्ताच्या नद्या वाहवल्यावाचून धर्मप्रचार झालेला नाही, आणि इथे हा महापुरुष भगवान बुद्धाला शरण जाताच त्याचे लाखो अनुयायी 'बुद्धं सरणं गच्छामी' अशा गर्जना करीत त्याच्यामागून शांतपणे चालू लागतात. असा चमत्कार जगाने कधी पाहिला आहे ? डिमेटर देवतेप्रमाणे आपल्या मुलांना निखाऱ्यावर भाजण्याचे काम पूर्ण होण्याच्या आधीच आंबेडकरांना येथून जावे लागले. ते उरलेले अग्निदिव्य आता स्वतःच्याच बळाने आणि धैर्याने त्यांनी संपवायला हवे.

- आचार्य प्र.के.अत्रे

(साभार : दलितांचे बाबा डॉ. बाबासाहेब आंबेडकर)




बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय



मास्क नेहमी लावा, नाक अन चेहऱ्याला पुन्हा पुन्हा हात लावू नका !







डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्वाक्षरी



१६ मे १९४९ रोजी दिल्लीच्या संसद भवनात घटना समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि समितीचे संयुक्त सचिव एस. एन. मुखर्जी व सदस्या बेगम ऐजाज रसूल चर्चा करताना.



रमाबाई आंबेडकर, लक्ष्मीबाई आंबेडकर (बसलेल्या, डावीकडून दुसऱ्या व तिसऱ्या) यांच्यासह इतर नातलग मंडळी.



२० जुलै १९४२ रोजी नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृतवर्ग महिला परिषद झाल्यानंतर घेतलेले छायाचित्र.



मुंबईच्या हिंदू कॉलनीतील राजगृह निवासस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कुटुंबीय.
डावीकडून यशवंत (मुलगा), डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पत्नी रमाबाई आंबेडकर,
वहिनी लक्ष्मीबाई (आनंदराव यांच्या पत्नी), मुकुंदराव (पुतण्या) आणि त्यांचा आवडता कुत्रा टॉबी.
राजगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेब्रुवारी १९३४ मध्ये राहावयास आले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर वस्त्यावस्त्यांत जाऊन अस्पृश्यांमध्ये वैचारिक जागृतीचे कार्य करत होते. सन १९४० मध्ये वरळीच्या (मुंबई) बीडीडी चाळीत घेतलेल्या या छायाचित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या सहकाऱ्यांसह दिसत आहेत.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि 'भीमराज स्काऊट पथकाचे' कर्नाटक, सातारा व कोल्हापूरातील सहकारी तसेच इतर कार्यकर्ते. सन १९४० मध्ये 'कोल्हापूर गेस्ट हाऊस' समोर हा फोटो घेतलेला आहे.



मुंबईतील अस्पृश्य महिला समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवस दादरच्या हिंदू कॉलनीतील त्यांच्या निवासस्थानी १४ एप्रिल १९४२ रोजी साजरा केला. या प्रसंगी महिला कार्यकर्त्यांसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



कामाठीपुऱ्यात राहणाऱ्या मुरळ्या, देवदासी, जोगतिणी यांची दामोदर हॉल, परळ येथे सभा. या वेळी " जातीस बट्टा लावण्याचे काम करु नका. हीन कामाचा त्याग करा " असा उपदेश. १६ जून १९३६, मुंबई.



घटना समितीने नेमलेल्या घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्वतंत्र भारताच्या घटनेचा अंतिम मसुदा हा घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना सुपूर्द केला, तो ऐतिहासिक क्षण (२५ नोव्हेंबर १९४९ )

# भारताचे संविधान

आम्ही, भारताचे लोक,

भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार,
अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे
स्वातंत्र्य ; दर्जाची व संधीची समानता;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये
व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी बंधुता
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
आमच्या संविधानसभेत आज दिनांक सव्वीस
नोव्हेंबर, १९४९ रोजी याद्वारे हे
संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करून स्वत:प्रत अर्पण करत आहोत.

# भारताचे संविधान

## भाग तीन

## मूलभूत हक्क

### सर्वसाधारण

१२. व्याख्या. - या भागात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, “राज्य” या शब्दात, भारताचे सरकार व संसद आणि राज्यांपैकी प्रत्येक राज्याचे शासन व विधानमंडळ आणि भारताच्या राज्यक्षेत्रातील अथवा भारत सरकारच्या नियंत्रणाखालील सर्व स्थानिक किंवा अन्य प्राधिकरणे यांचा समावेश आहे.

१३. मूलभूत हक्कांशी विसंगत असलेले अथवा त्यांचे न्यूनीकरण करणारे कायदे. - (१) या संविधानाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी भारताच्या राज्यक्षेत्रात अंमलात असलेले सर्व कायदे, ते जेथवर या भागाच्या तरतुदींशी विसंगत असतील तेथवर, ते अशा विसंगतीच्या व्याप्तीपुरते शून्यवत असतील.

(२) राज्य, या भागाने प्रदान केलेले हक्क हिरावून घेणारा किंवा त्यांचा संकोच करणारा कोणताही कायदा करणार नाही आणि या खंडाचे उल्लंघन करून केलेला कोणताही कायदा त्या उल्लंघनाच्या व्याप्तीपुरता शून्यवत असेल.

(३) या अनुच्छेदात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, -

(क) “कायदा” यात, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्याइतकाच प्रभावी असलेला कोणताही अध्यादेश, आदेश, उपविधी, नियम, विनियम, अधिसूचना, रुढी किंवा परिपाठ यांचा समावेश आहे;

(ख) “अंमलात असलेले कायदे” यात, भारताच्या राज्यक्षेत्रातील विधानमंडळाने किंवा अन्य सक्षम प्राधिकाऱ्याने या संविधानाच्या प्रारंभापूर्वी पारित केलेल्या किंवा केलेल्या व पूर्वी निरसित न झालेल्या कायद्याचा समोवश आहे - मग असा कोणताही कायदा किंवा त्याचा कोणताही भाग त्यावेळी मुळीच किंवा विशिष्ट क्षेत्रांमध्ये अंमलात नसला तरी हरकत नाही.

[ (४) या अनुच्छेदातील कोणतीही गोष्ट अनुच्छेद ३६८ अन्वये केलेल्या संविधानाच्या कोणत्याही सुधारणेस लागू असणार नाही. ]

# भारताचे संविधान

## भाग चार -क

## मूलभूत कर्तव्ये

**५१ क. मूलभूत कर्तव्ये : -**

(क) संविधानाचे पालन करणे आणि त्याचे आदर्श व संस्था, राष्ट्रध्वज व राष्ट्रगीत यांचा आदर करणे;

(ख) ज्यांमुळे आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्य लढ्यास स्फूर्ती मिळाली त्या उदात्त आदर्शांची जोपासना करुन त्यांचे अनुसरण करणे ;

(ग) भारताची सार्वभौमता, एकता व एकात्मता उन्नत ठेवणे व त्यांचे संरक्षण करणे ;

(घ) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजावणे ;

(ङ) धार्मिक, भाषिक व प्रादेशिक किंवा वर्गीय भेदांच्या पलीकडे जाऊन भारतातील सर्व जनतेमध्ये सामंजस्य व बंधुभाव वाढीला लावणे ; स्त्रियांच्या प्रतिष्ठेला उणेपणा आणणाऱ्या प्रथांचा त्याग करणे ;

(च) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे मोल जाणून तो जतन करणे ;

(छ) वने, सरोवरे, नद्या व वन्य जीवसृष्टी यांसह नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुन त्यात सुधारणा करणे आणि प्राणिमात्रांबद्दल दयाबुद्धी बाळगणे ;

(ज) विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी व सुधारणावाद यांचा विकास करणे ;

(झ) सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण करणे व हिंसाचाराचा निग्रहपूर्वक त्याग करणे ;

(ञ) राष्ट्र सातत्याने, उपक्रम व सिद्धी यांच्या चढत्या श्रेणी गाठत जाईल अशा प्रकारे व्यक्तिगत व सामुदायिक स्वरुपाच्या सर्व कार्यक्षेत्रात पराकाष्ठेचे यश संपादन करण्यासाठी झटणे ;

(ट) मातापित्याने किंवा पालकाने सहा ते चौदा वर्षांदरम्यानचे आपले अपत्य किंवा, यथास्थिति, पाल्य याला शिक्षणाच्या संधी देणे,

ही प्रत्येक भारतीय नागरिकाची कर्तव्ये असतील.



भारतीय घटना समितीच्या सन्माननीय सदस्यांसमवेत घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद, पं



२६ जानेवारी, १९५० पासून स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेचा अंमल सुरु झाला. प्रजासत्ताक भारताचे पहिले कायदेमंत्री म्हणून डॉ. बाबासाहेबांना राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी शपथ दिली. पंतप्रधान नेहरु शेजारी बसलेले (८ मे, १९५०).



घरातील लहान मुलं आणि ज्येष्ठ नागरिकांची विशेष काळजी घ्या. !



पं. नेहरू, वल्लभभाई पटेल व घटना मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर.



२६ जानेवारी, १९५० रोजी स्वतंत्र भारताची राज्यघटना अंमलात आली. तत्पूर्वी गव्हर्नर राजगोपालाचारी यांना समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. त्याप्रसंगी पंतप्रधान पंडित नेहरु, वल्लभभाई पटेल, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर मंत्रिगण.



नाशिक जिल्हा मध्यवर्ती मंडळाचे दसरा सम्मेलन मुंबईतील दामोदर हॉल, परळ (९ ऑक्टोबर १९३२)
याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री. सी.ना. शिवतरकर व इतर सहकाऱ्यांसोबत घेतलेले छायाचित्र.



डॉ. आंबेडकरांनी स्थापन केलेल्या औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाच्या इमारती समोर
काढलेल्या छायाचित्रात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत (डावीकडून) आर्किटेक्ट नार्वेकर,
प्रि. म. भि. चिटणीस, माई आंबेडकर, रावबहादूर सी. के. बोले, कमलाकर चित्रे आणि बी. एच. वराळे.


सॅनिटायझरची लहान बाटली जवळ ठेवा ! साबणाने वारंवार हात धुवा !



पुणे कराराच्या चर्चेत सहभागी झालेल्या नेत्यांचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसह येरवडा तुरुंगासमोरील छायाचित्र. डाव्या कोपऱ्यात बॅ. एम. आर. जयकर व उजव्या कोपऱ्यात प्रसिद्ध खेळाडू पी. बाळू (२४ सप्टेंबर, १९३०).



४ जानेवारी १९५४ रोजी आचार्य अत्रे निर्मित व दिग्दर्शित 'महात्मा फुले' चित्रपटाचा मुहूर्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते मुंबईतील फेमस स्टुडिओत झाला. त्याप्रसंगीच्या छायाचित्रात आचार्य अत्रे भाषण करताना, समवेत (डावीकडून) कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माई आंबेडकर, महात्मा फुले यांच्या भूमिकेतील बाबूराव पेंढारकर व मागे डाव्या कोपऱ्यात शाहीर अमर शेख उभे आहेत.



बौद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर लगेचच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उपस्थित असलेल्या आपल्या लाखो अनुयायांना स्वहस्ते धम्म दीक्षा देऊन स्वतः तयार केलेल्या २२ प्रतिज्ञा वदवून घेतल्या.



प्रत्यक्षात धर्मांतर करण्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देहू रोड (जिल्हा पुणे) येथे नव्याने बांधलेल्या बुद्ध विहारात स्वतः आणलेल्या बुद्धमूर्तीची प्रस्थापना केली. त्याप्रसंगी मूर्तीसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डॉ. माईसाहेब आंबेडकर (२५ डिसेंबर,१९५४).



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हस्ते बौद्ध धम्माची दीक्षा घेण्यासाठी नागपूर येथील दीक्षाभूमीवर जमलेला प्रचंड जनसमुदाय.



धम्म दीक्षा समारोहाला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती, याची साक्ष देणारे प्रस्तुत छायाचित्र. १४ ऑक्टोबर १९५६.

धम्मदीक्षा घेतल्यानंतर 'मी बौद्ध धम्मच का स्वीकारला?'
याचे जाहीर सभेत सविस्तर विवेचन करीत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर



ऑक्टोबर १९३५ मध्ये येवला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "मी अस्पृश्य हिंदू म्हणून जन्माला आलो, पण हिंदू म्हणून मरणार नाही",अशी शपथ घेतली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बाबासाहेबांनी नागपूर येथे औपचारिकरीत्या बौद्ध धर्माचा स्वीकार लाखो अनुयायांसमवेत केला. तलवार किंवा बंदुकीच्या धाकाशिवाय आणि धनसंपत्तीचे कोणतेही आमिष दाखविल्याशिवाय एवढ्या मोठ्या प्रमाणावर धर्मान्तर झाल्याचे दुसरे उदाहरण जगाच्या इतिहासात सापडणार नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बावीस प्रतिज्ञा

- मी ब्रह्मा, विष्णू आणि महेश यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी राम व कृष्ण यांना देव मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- मी गौरी-गणपती इत्यादी हिंदू धर्मातील कोणत्याही देवदेवतेस मानणार नाही किंवा त्यांची उपासना करणार नाही.
- देवाने अवतार घेतले यावर माझा विश्वास नाही.
- बुद्ध हा विष्णूचा अवतार आहे हा खोटा आणि खोडसाळ प्रचार होय, असे मी मानतो.
- मी श्राद्धपक्ष करणार नाही; पिंडदान करणार नाही.
- बौद्ध धम्माच्या विरुद्ध विसंगत असे कोणतेच आचार कर्म मी करणार नाही.
- कोणतेही क्रियाकर्म ब्राह्मणांच्या हातून करवून घेणार नाही.
- सर्व मनुष्यमात्र समान आहेत, असे मी मानतो.
- मी समता स्थापन करण्याचा प्रयत्न करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब करीन.
- मी भगवान बुद्धाने सांगितलेल्या दहा पारमिता पाळीन.
- मी सर्व प्राणिमात्रावर दया करीन, त्यांचे लालनपालन करीन.
- मी चोरी करणार नाही.
- मी खोटे बोलणार नाही.
- मी व्यभिचार करणार नाही.
- मी दारु पिणार नाही.
- मी प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध धम्माच्या तीन तत्त्वांची सांगड घालून माझे जीवन चालविन.
- माझ्या जुन्या मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला हानिकारक असणाऱ्या आणि मनुष्यमात्राला असमान व नीच मानणाऱ्या हिंदू धर्माचा मी त्याग करतो व बुद्धाच्या धम्माचा स्वीकार करतो.
- बुद्ध धम्म हा सधम्म आहे, अशी माझी खात्री पटलेली आहे.
- माझा नवा जन्म होत आहे, असे मी मानतो.
- इत:पर मी बुद्धाच्या शिकवणीप्रमाणे वागेन, अशी प्रतिज्ञा करतो.

# महापरिनिर्वाण दिनी अनुयायांना जाहीर आवाहन

- 'कोविड-१९' म्हणजेच 'कोरोनाचा' प्रादुर्भाव लक्षात घेता संसर्ग टाळण्याच्या दृष्टीने देण्यात येणाऱ्या प्रतिबंधात्मक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.
- महापरिनिर्वाणदिनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना आपापल्या घरुनच अभिवादन करावे. याकरिता चैत्यभूमी येथून ऑनलाईन थेट प्रक्षेपण सुविधा पुढील इंटरनेट लिंकवर उपलब्ध :
  १. https://bit.ly/abhivadan2020yt २. https://bit.ly/abhivadan2020fb
  ३. https://bit.ly/abhivadan2020tt
- महापरिनिर्वाण दिन हा सर्वांनी गांभीर्यपूर्वक पाळावा.
- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या विचारांचे चिंतन आणि अनुकरण करावे.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना सदाचारी जीवन जगण्याचा संकल्प करावा.
- महानगरपालिका, पोलीस दल आणि समता सैनिक दल कार्यकर्ते यांच्या सुचनांचे अनुयायांनी पालन करावे.
- अनुयायांनी भगवान बुद्धांच्या शांततेचा मार्ग अवलंबून सामुदायिक वंदना घ्यावी. त्यावेळी शांतता पाळावी व इतरांना शांत रहावयास सांगावे.
- या दिनी भगवान बुद्ध , डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित साहित्य, पुस्तके, सीडी, धम्मध्वज, बिल्ले तसेच विज्ञानवादी विचारांवर आधारित धम्म दिनदर्शिका / पुस्तके विकत घ्यावीत. ती वाचावीत व इतरांना वाचायला द्यावीत!
- या दिनी कोणत्याही प्रकारचे वाद्य वाजवू नये, घोषणा देऊ नये.
- बेवारस वस्तुंना स्पर्श करु नये व सदर बाबतीत त्वरित पोलिसांना कळवावे.
- अंधश्रध्दा तसेच अफवा पसरवणाऱ्यांपासून सावध रहावे.
- घातपाती कृत्ये / दुर्घटना टाळण्यासाठी प्रत्येक अनुयायाने जागृत पोलिसांसारखी दक्षता बाळगावी. संशयित व्यक्ती, वस्तू आढळल्यास त्यांच्यावर पाळत ठेऊन तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा किंवा मदतीसाठी १०० क्रमांकावर संपर्क साधावा.
- कोणत्याही प्रकारच्या मदतीकरीता पोलीस नियंत्रण कक्ष, महापालिका कक्ष तसेच कार्यकर्ते / समन्वयक यांच्याशी संपर्क साधावा.
- मद्यपान व धूम्रपान करु नये, रहदारीच्या मार्गांमध्ये घोळक्याने उभे राहून नागरिकांना अडथळा करु नये.
- समुद्रात जाऊ नये.
- चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान आणि अनुयायांचा वावर असलेले सर्व परिसर स्वच्छ राखावे. महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या कचरा कुंडीतच कचरा टाकावा.
- महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेले पिण्याचे / वापराचे पाणी वाया जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचे, त्यागाचे स्मरण करणे आणि त्यांचे अनुकरण करणे,**
**हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.**



भारतीय बौद्धजन समितीच्या (शाखा नागपूर) सामुदायिक धर्मांतर व्यवस्थापक मंडळासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१४ ऑक्टोबर १९५६ रोजी शाम हॉटेल, नागपूर).



आंबेडकर स्कूल ऑफ पॉलिटिक्स या संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व शेड्युल कास्ट्स फेडरेशनचे नेते यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर ( पुणे, ४ ऑक्टोबर १९४५ )

# महामानवाचे महापरिनिर्वाण



■ ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाल्यानंतर ७ डिसेंबरला त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी लाखो लोक मूकपणे दहा तास रांगेत उभे होते. साऱ्या मुंबई महानगरीवर दु:खाची छाया पसरली होती. दुपारी दीड वाजता राजगृहावरुन अंत्ययात्रा निघाली. व्हिसेंट रोड (आताचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग), एल्फिन्स्टन पूल, सयानी मार्ग, गोखले मार्ग या रस्त्यांनी ती दोन-तीन मैल लांबीची अंत्ययात्रा सात तासानंतर हळूहळू शिवाजी पार्क जवळच्या स्मशानभूमीवर येऊन पोहोचली. साश्रू नयनांनी 'बाबासाहेब अमर रहे' च्या घोषणा देत अथांग जनसागर या महामानवाला अखेरचा निरोप देतांना शोकाकुल झाला होता.



चैत्यभूमी, दादर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अर्धपुतळा.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६३ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमीवर बाबासाहेबांना अभिवादन करताना महाराष्ट्राचे मा. राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी, मा. मुख्यमंत्री श्री. उद्धवजी ठाकरे, मा. विधानसभा सभापती श्री. नाना पटोले, मा. उपसभापती डॉ. श्रीमती निलम गोऱ्हे, मा. महसुलमंत्री श्री. बाळासाहेब थोरात, मा. जलसंपदामंत्री श्री. जयंत पाटील, मा. गृहनिर्माणमंत्री श्री. जितेंद्र आव्हाड, मा. पर्यावरणमंत्री श्री. आदित्य ठाकरे, मा. महापौर श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर, स्थायी समिती अध्यक्ष श्री. यशवंत जाधव व मान्यवर.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन महापालिका नियोजन समिती



**भारतरत्न
डॉ. बाबासाहेब
आंबेडकर :**

**जागृतीचे प्रणेते**



अध्यक्ष - मा. महापौर
उपाध्यक्ष - मा. अध्यक्ष, स्थायी समिती
सर्व अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त
मानद सचिव - मा. महानगरपालिका आयुक्त

## नियोजन समिती सदस्य

श्री. राहुल शेवाळे, मा. खासदार
श्रीमती यामिनी जाधव, मा. आमदार
मा. सभागृह नेता
मा. विरोधी पक्षनेता
अध्यक्ष, सुधार समिती
अध्यक्षा, शिक्षण समिती
अध्यक्ष, बेस्ट समिती
श्रीमती राखी जाधव, गटनेता - राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष
श्रीमती प्रितम पंडागळे - नगरसेविका
श्रीमती वैशाली नवीन शेवाळे - नगरसेविका
श्रीमती रोहिणी योगेश कांबळे - नगरसेविका
श्री. श्रीकांत गोविंद शेटये - नगरसेवक
श्रीमती प्रविणा मनिष मोरजकर - नगरसेविका
श्री. रामदास देविदास कांबळे - नगरसेवक
श्रीमती समिता कांबळे - नगरसेविका
श्रीमती उर्मिला उल्हास पांचाळ - नगरसेविका
श्रीमती समृद्धी काते - नगरसेविका
श्रीमती संगिता चंद्रकांत हंडोरे - नगरसेविका
श्रीमती प्रणिता योगेश गिरकर - नगरसेविका
ॲड. संतोष नामदेव (आबा) खरात, नगरसेवक
श्रीमती प्रतिभा खोपडे - नगरसेविका
श्रीमती चंद्रावती मोरे - नगरसेविका


मधुमेह, हृदयविकार, किडनी आजार, लठ्ठपणा; या सारखे आजार असतील तर घ्या खूप काळजी !

## बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| व्यवस्था | दूरध्वनी |
|---|---|
| म.न.पा. नियंत्रण कक्ष | १९१६ |
| आपत्कालीन व्यवस्थापन | २२६९ ४७२५-२७ |
| म.न.पा. अग्निशमन दल (भायखळा) | १०१ आणि २३०७ ६१११ |
| म.न.पा. अग्निशमन दल (वडाळा) | २४१३ २०६०-६२, २४१३२०५८ |
| घनकचरा व्यवस्थापन नियंत्रण कक्ष (शहर) | २४९३ ५६८९ |
| महापालिका आयुक्त | २२६२ ०५२५ |
| अति. महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) | २२६२ ०८०९ |
| अति. महापालिका आयुक्त (शहर) | २२६२ ०४३३ |
| अति. महापालिका आयुक्त (प्रकल्प) | २२६२ ३००४ |
| अति. महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) | २२६२ ०१४९ |
| उप आयुक्त (परिमंडळ - २) | २४१५ ०४०० |
| सहाय्यक आयुक्त - जी/उत्तर विभाग | २४३९ ७८०० (P) २४३० ०५१३ |
| जनसंपर्क अधिकारी | २२७५ ४५३६ |

## इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक

| | |
|---|---|
| मंत्रालय (नियंत्रण कक्ष) | २२०२ ७९९०/२२०२ ४२४३ |
| मुंबई पोलीस नियंत्रण कक्ष | १०० आणि २२६२ ५०२० |
| पोलिस उप आयुक्त (परिमंडळ - ५) | २४८८ ८४२१/२४९२ ७३०८ |
| वाहतूक पोलिस | २४९३ ७७५५ |
| बेस्ट वाहतूक नियंत्रण कक्ष (वडाळा) | २४१४ ३६११ किंवा २४१४ ६५३३ |
| बेस्ट वाहतूक टोल फ्री क्रमांक | १८०० २२७५५० |
| विद्युत पुरवठा (बेस्ट) (दादर नियंत्रण कक्ष-उत्तर) | २४१४ ४८९७ व २४१४ ५८८८ |
| नागरी सुरक्षा दल | २२८४ ३६६७ |
| होमगार्ड मुख्यालय | २२८४ २४२३ |
| पश्चिम रेल्वे (चर्चगेट) | २२०८ ४२८७ |
| पश्चिम रेल्वे (मुंबई सेंट्रल) | २३०७ ०५६४ |
| मध्य रेल्वे नियंत्रण कक्ष | २२६२ ०३७७ |
| दूरदर्शन | २४९६ ५८०० |
| आकाशवाणी | २२०२ ६२४२ |
| दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया (चैत्यभूमी) | २४१८ ५५९७/९८६७० ८७२५१ |
| पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे डॉ. आंबेडकर महाविद्यालय (वाणिज्य आणि अर्थशास्त्र), (वडाळा) मुंबई. | २४१२ २३९६/२४१६ ३३०० |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समिती | ९८२०५ २१५४४ / ९८१९४ ९०८६८ |

## चैत्यभूमी (दादर) येथील प्रवेशद्वार व भिमज्योत



# बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनी दरवर्षी उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या नागरी सेवा-सुविधा



डॉ. बाबासाहेबांच्या विविध जीवन पैलूंबाबत छायाचित्र प्रदर्शन कक्ष



छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे मोफत वैद्यकीय सेवा-सुविधा



१ लाख चौरस फूट क्षेत्रफळाच्या मंडपात तात्पुरता निवारा



चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे धूळ होऊ नये यासाठी कार्पेट व्यवस्था.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिनानिमित्त माहिती पुस्तिकेचे प्रकाशन व मोफत वाटप.



धूम्र फवारणी करुन चैत्यभूमी परिसर निर्जंतुक करण्यात येतो.



विविध ठिकाणी फिरत्या शौचालयांची व्यवस्था करण्यात येते.



शॉवर असलेल्या स्नानगृहांची व्यवस्था करण्यात येते.

(संग्रहीत छायाचित्रे : दिनांक ६ डिसेंबर २०१९)



# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर :

## जागृतीचे प्रणेते






- महानगरपालिका नियंत्रण कक्ष
- तात्पुरत्या निवाऱ्यासाठी मंडपाची व्यवस्था
- अभिवादन रांग
- बाहेर जाण्याचा मार्ग
- वैद्यकिय कक्षाकडे जाण्याचा मार्ग
- शिवाजी पार्क मैदानामध्ये अनुयायांकरिता १८ युनिटची (१८०) फिरती शौचालये व रांगेतील अनुयायांसाठी ०४ युनिटची (४०) फिरती शौचालये
- २०० स्नानगृहे
- निरीक्षण मनोरे (वॉच टॉवर्स)
- वैद्यकीय कक्ष
- माननीय भंतेजी निवास व्यवस्था
- रुग्णवाहिका
- पिण्याच्या पाण्याची व्यवस्था (टँकर)
- पोलिस नियंत्रण कक्ष
- अन्न वाटपाची व्यवस्था
- पुस्तके, धार्मिक साहित्य विक्रेता विभाग
- कॅसेट्स, सीडीज, विक्रेता विभाग
- विद्युत खांब
- तात्पुरते अग्निशमन केंद्र
- जीवरक्षक बोटीची व्यवस्था
- तात्पुरती शौचालये
- पाण्याची सुविधा
- दादर रेल्वे स्थानकापासून चैत्यभूमीकडे जाण्याचा मार्ग
- माहिती कक्ष
- श्रीमान बाळासाहेब ठाकरे स्मृती स्थळ
- प्लाझा सिनेमा



# छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथील ६ डिसेंबर २०१९ रोजीची व्यवस्था



माझे कुटुंब
माझी जबाबदारी

# कोरोनासोबत जगायला शिकण्याची गरज



## नागरिकांनी जागरुक राहिल्यास कोरोनापासून मिळेल मुक्ती

२ मीटर

- मास्क नियमित वापरा
- वारंवार हात स्वच्छ धुवा
- २ मीटरचे सुरक्षित अंतर पाळा

## आपली सुरक्षा आपल्याच हाती




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील निवासस्थान 'राजगृह', हिंदू कॉलनी, दादर

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी ऑनलाईन

चला सारे मिळून करू
बाबासाहेबांना ऑनलाईन अभिवादन !



महामानव भारतरत्न
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
यांना
**कोटी कोटी अभिवादन**

यंदा कोरोना संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून महापरिनिर्वाण दिनी पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा - सुविधा अंशतः रद्द करण्यात आल्या आहेत.

महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीचे ऑनलाईन थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी सोबत दर्शविलेला क्यू आर कोड किंवा सोशल मीडिया लिंक यांचा कृपया उपयोग करावा.

| Youtube | Facebook | Twitter |
|---|---|---|
| https://bit.ly/abhivadan2020yt | https://bit.ly/abhivadan2020fb | https://bit.ly/abhivadan2020tt |

| इ. सिं. चहल | ॲड. सुहास वाडकर | श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर |
|---|---|---|
| महानगरपालिका आयुक्त | उपमहापौर, मुंबई | महापौर, मुंबई |

**नको गर्दी, नको संसर्ग - कोविडपासून करू आपलं नि आपल्यांचं रक्षण**

PRO/1097/ADV/2020-21

# कोविड -१९ बाबतच्या माहितीकरिता

## किंवा

## रुग्णशय्येची (बेड) आवश्यकता असल्यास

## आपल्या विभागाच्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधा.

@mybmc
StopCoronavirus.MCGM.gov.in

सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यास रु.१०००/- दंड करण्यात येईल.

| विभाग | नियंत्रण कक्ष क्रमांक | विभाग | नियंत्रण कक्ष क्रमांक |
|---|---|---|---|
| ए | ०२२-२२७००००७ | के/पश्चिम | ०२२-२६२०८३८८ |
| बी | ०२२-२३७५९०२३ | पी/दक्षिण | ०२२-२८७८०००८ |
| सी | ०२२-२२१९७३३१ | पी/उत्तर | ०२२-२८४४०००१ |
| डी | ०२२-२३८३५००४ | आर/दक्षिण | ०२२-२८०५४७८८ |
| ई | ०२२-२३७९७९०१ | आर/उत्तर | ०२२-२८९४७३५० |
| एफ/दक्षिण | ०२२-२४१७७५०७ | आर/मध्य | ०२२-२८९४७३६० |
| एफ/उत्तर | ०२२-२४०११३८० | एल | ०२२-२६५०९९०१ |
| जी/दक्षिण | ०२२-२४२१९५१५ | एम/पूर्व | ०२२-२५५२६३०१ |
| जी/उत्तर | ०२२-२४२१०४४१ | एम/पश्चिम | ०२२-२५२८४००० |
| एच/पूर्व | ०२२-२६६३५४०० | एन | ०२२-२१०१०२०१ |
| एच/पश्चिम | ०२२-२६४४०१२१ | एस | ०२२-२५९५४००० |
| के पूर्व | ०२२-२६८४७००० | टी | ०२२-२५६९४००० |

# बृहन्मुंबई महानगरपालिका

## महामानव, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायांना विनम्र आवाहन

कोरोनावर हमखास असा तोडगा सापडेपर्यंत जीवनशैलीमध्ये बदल करणे अत्यावश्यक झाले आहे. नाक, तोंड व्यवस्थित झाकले जाईल अशा रितीने मास्क नेहमी वापरा. सर्वत्र वावरताना नागरिकांनी आपसात किमान ६ फूट सुरक्षित अंतर राखावे. वारंवार हात स्वच्छ धुवावेत. गरजेनुसार निर्जंतुकीकरण द्रव्याचा (सॅनिटायझर) वापर करा. तसेच या त्रिसूत्रीपलीकडे जाऊन आता दैनंदिन जीवनात नवीन बदलांचा स्वीकार करणे भाग आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे काही महत्वाच्या मार्गदर्शक सूचना पाळा.

- लहान मुले, ज्येष्ठ नागरिक यांची योग्य काळजी घ्या. खासकरुन ज्यांना सहव्याधी (को-मॉर्बिडीटी) आहेत, त्यांच्याकडे विशेष लक्ष द्यावे.
- प्रतिकारशक्ती टिकविण्यासाठी सकस आहार घ्या. पुरेशी झोप घ्या. व्यायाम करा.
- कोणतेही लक्षण दिसल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या.
- कोरोनाची लक्षणे असताना कुठे-कुठे गेलो, कोणाला भेटलो, ते आठवून नोंदी ठेवा.
- जेवताना समोरासमोर बसू नका. शेजारी-शेजारी बसा.
- कोणाशीही बोलताना थेट चेहऱ्याकडे बघू नका. एकमेकांच्या वस्तुंचा वापर करु नका.
- बाहेरुन आल्यावर आधी आंघोळ करावी. कपडे धुण्यासाठी थेट बादलीमध्ये टाका.
- फरशी,स्वयंपाकगृह,प्रसाधनगृहे, इतर वस्तू यांची नेहमी स्वच्छता ठेवा.
- शक्यतो जिन्याचा उपयोग करा. लिफ्टची बटणे दाबताना कागदी कपटे वापरा.
- कोरोनासंबंधी कामकाजामध्ये शासकीय यंत्रणेला सहकार्य करा.
- मास्क नसल्यास दुकानांमध्ये ग्राहकांना प्रवेश देऊ नका. तसेच प्रवेश देताना ग्राहकांच्या हातांवर सॅनिटायझर फवारा.
- गरजेपुरत्याच कर्मचाऱ्यांना कार्यालयात बोलवावे. आळीपाळीने कर्मचारी नेमावे.
- हवा खेळती राहण्यासाठी खिडक्या उघड्या ठेवा. वातानुकूलन यंत्रणेचा वापर टाळा.
- व्हिडिओ कॉन्फरन्सिंग, वर्क फ्रॉम होम, ऑनलाईन कामकाज यावर भर द्या.
- वाहन चालवताना / प्रवास करतानाही मास्क लावा. त्यामुळे संसर्गाचा धोका टळतो.
- बंदिस्त व अरुंद वातावरण, दाटीवाटी, गर्दी, निकटचा संपर्क अशा बाबी प्रकर्षाने टाळा.
- सार्वजनिक ठिकाणी वावरताना थुंकू नये.
- कडीकोयंडा, कठडे (हॅण्ड रेलिंग), लिफ्ट, बाक असे कुठेही हात लावणे टाळा.
- कोणत्याही सूचनेचे नकळत उल्लंघन होत असल्यास एकमेकांच्या लक्षात आणून द्या.

नजीकचे आरोग्य केंद्र, रुग्णालय, नियंत्रण कक्ष असे महत्त्वाचे संपर्क क्रमांक ठळकपणे आपल्या परिसरात प्रदर्शित करा.

**कोविड सोबत जगायला शिकूया ! नवीन जीवनशैली स्वीकारुया !!**

महामानव, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाणदिनी भारताच्या काना-कोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने अनुयायी चैत्यभूमी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर नत-मस्तक आणि अभिवादन करण्यासाठी दरवर्षी येत असतात. या अनुयायांसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे विविध नागरी सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत असतात. पण यावर्षी मुंबईसह जगभरात ‘कोविड-१९’ चा प्रादुर्भाव लक्षात घेता महानगरपालिकेतर्फे चैत्यभूमी, छत्रपती शिवाजी महाराज मैदानासह इतर ठिकाणी पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधा काही अंशी कमी करण्यात आल्या आहेत.

| **श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर**<br>मा. महापौर, मुंबई | **ॲड. सुहास वाडकर**<br>मा. उप महापौर, मुंबई | **श्री. इ. सिं. चहल**<br>मा. महानगरपालिका आयुक्त |
| --- | --- | --- |

**तानाजी ह. कांबळे**, जनसंपर्क अधिकारी (प्र.) यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका, मुख्यालय, येथून प्रकाशित केले.

। **मुद्रक** : व्यवस्थापक, बृहन्मुंबई महानगरपालिका मुद्रणालय, मुंबई - ४०० ०११. ।